नि. फौजदारी खटला क्र. **११५/२०२३**
सरकार विरूद्ध अरविंद शेळके
**निशाणी १४ खाली**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची उलटतपासणी शपथेवर सुरू</u>—आरोपीतर्फे अॅड. एस.के. पुराडउपाध्याय यांचे मार्फत :**

मला मराठी भाषा कळते. रिपोर्ट **नि.१५** दाखल केल्यानंतर पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते. न्यायालया समक्ष माझे कलम १६४ नुसार बयाण नोंदविण्यात आले होते. रिपोर्ट **नि. १५** माझे सांगणेप्रमाणे लिहीन्यात आलेला आहे.

माझे वडीलांनी आरोपीला झाडले होते असा मजकूर मी पोलिंसाना बयाण देतांना सांगितला होता परंतु माझे बयाणात शब्दशः तसा मजकूर नमुद नाही. सदर मजकूर शब्दशः नमुद नसन्याचे कारण असे की, प्रत्येक वेळेस आपण तेच शब्द सांगत नसतो.

मैत्रीणी मार्फत आरोपीला समज देण्याचा प्रत्यन केला असा मजकूर मी पोलिंसाना बयाण देतांना सांगितला नव्हता.

मी पोलिसांना बयाण देतांना आरोपीने माझा एक—दोन दिवस पाठलाग केला असे सांगितले होते. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले, माझे बयाणात पाठलाग केला असे नमुद आहे, परंतु माझे बयाणात एक—दोन दिवस असा शब्द नमुद नाही. एक—दोन हा शब्द का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

आरोपी हा विद्युत कॉलणी अकोट येथे राहतो हे मी रिपोर्ट **नि.१५** देतांना पोलिसांना सांगितले नव्हते. पोलिसांना बयाण देतांना आरोपी हा अवधूत कॉलणी अकोट येथे राहतो असे मी पोलिसांना सांगितले नव्हते. पोलिसांनी माझे बयाणात आरोपी हा

अवधूत कॉलणी अकोट येथे राहतो असे का लिहीले याचे कारण मला सांगता येणार नाही.

मी रिपोर्ट देतांना दिनांक २७.०२.२०२३ रोजी शेळके याने मला ८८०५३६४१२३ या मो. क्रमांकावरून अश्लील कॉल केले असे पोलिसांना सांगितले होते, परंतु सदर मजकूर माझे कलम १६१ प्रमाणेच्या जबाबात नमुद नाही. आता मला कलम १६१ चे बयाण दाखविले. त्यामध्ये सदर मजकूर नमुद नाही. सदर मजकूर माझे बयाणानात का नमुद नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

मी रिपोर्ट **नि.१५** देतांना त्यामुळे मी त्याला ब्लॉक केले असे पोलिसांना सांगितले होते, परंतु सदर मजकूर माझे कलम १६१ प्रमाणेच्या जबाबात नमुद नाही. आता मला कलम १६१ चे बयाण दाखविले. त्यामध्ये सदर मजकूर नमुद नाही. सदर मजकूर माझे बयाणानात का नमुद नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

**प्रश्न :** आरोपीचा रिपोर्ट नि.१५ मधील नमुद मो. क्रमांक ९३७३१७४८७४ तुम्हाला कसा मिळाला.

**उत्तर :** मला त्या नंबरवरून देखील कॉल आला होता म्हणून मिळाला.

हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने दोन वेगवेगळया नंबर वरून कॉल केला असे माझे रिपोर्टमध्ये नमुद नाही.

मला आरोपीने अडविल्याची घटना नेट कॅफे जवळ घडली. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांना आरोपीने मला कमल नेट कॅफे जवळ थांबवले असे सांगितले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्या नेट कॅफेचे नाव कमलच आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नेट कॅफेजवळ नेहमी रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याने कॉलजचे मुले जात—येत असतात.

**दोन्ही पक्षाच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपोवतो तहकुब करण्यात आला.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १६.१२.२०२५ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्र. २)

अकोट, ता. आकोट, जि. अकोला.